# नियमित दिवाणी दावा क्र.४३/२०१५ मधील नि.५ खालील आदेश

वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीच्या मनाई अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की, दावा मिळकत शेतजमीन मौजे कडेगांव, ता.कडेगांव, जि.सांगली येथील सर्व्हेनंबर २७१ गटनंबर ३४१/४ क्षेत्र ६६ आर व पोटखराब ०.०४ आर संपूर्ण क्षेत्र ही या दाव्याची दावा मिळकत आहे.

३. दावा मिळकत ही धोंडी बाळा लोहार यांची इनामी मिळकत होती. त्यांच्या पश्चात वारस नात्याने वारसांची कब्जे वहिवाट सुरु झाली व आहे. इनाम खालसा कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्या कायदयातील तरतुदीनुसार दि.३१. ०३. १९५९च्या आत आकाराचे ६ पट कब्जा हक्काची किंमत भरली तर ती इनामदार यांना रिग्रॅन्ड होण्यास पात्र होती. तसा फेरफार क्रमांक ४५१७ नोंद झाला. रक्कम भरली नसल्यामुळे मिळकतीला सरकारची मालकी व त्याच्या रेघेखाली इनामदार यांची नांवे अशी नोंद आहे. या मिळकतीचा मूळ रिव्हीजनल सर्व्हेनंबर २७१ होता. त्याचा गटनंबर ३४१ चे १ ते ५ असे वादी आणि प्रतिवादी व त्यांचे इतर भाउ यांच्यामध्ये वाटप झाले. या मिळकतीची पुढे कोणीही विक्री केल्यास ‘भावाभावामध्येच विक्री करावी’ असा तोंडी करार त्यांच्यामध्ये झाला होता. वादीचे भाउ दिनकर व बाबुराव यांनी त्यांचा हिस्सा रक्कम रुपये

५०,०००/- घेवून सोडून दिला. रिग्रॅन्ड झालेली नसल्यामुळे स्पष्ट मालकी हक्क निर्माण होत नव्हता व नाही. वादी हा दावा मिळकतीची सालोसाल मेहनत व मशागत करुन उत्पन्न घेत आला आहे. प्रतिवादी हे कायमपणे सांगली येथे राहतात. यापूर्वी दिवाणी दावा क्र.८६२/२००८ दाखल झाला होता. त्यामध्ये प्रतिवादी नं. १ यांनी वादीला मुख्यत्यारपत्र करुन दिले. तो दावा प्रलंबित आहे. प्रतिवादी नं.१ यांनी दावा मिळकतीतील वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा केला व मिळकत विक्री करण्याची धमकी दिली. शिवाय प्रतिवादी नं. २ यांनी त्यांची मिळकत दावा मिळकतीच्या पश्चिमेस आहे त्यामुळे दावा मिळकत आम्ही नांगरणार अशी धमकी दिली. तेव्हा प्रतिवादी नं. १ यांनी दावा मिळकत बेकायदेशिररित्या तबदील अगर विक्री करु नये तसेच दुस-या कोणाचेही हितसंबंध त्यात निर्माण करु नयेत म्हणून प्रतिवादी नं. १ यास तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी तसेच प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत,अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्याची मागणी केली.

४. प्रतिवादी नं. १ यांनी प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे निशाणी २६ नुसार दाखल करुन वादीच्या मनाई अर्जातील कथन खोटे असल्याचे व मान्य नसल्याचे सांगून त्यांचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, दावा मिळकतीची वाटणी झालेली आहे व त्यानुसार दावा मिळकत प्रतिवादी नं. १ याच्या वाटणीस आली. वादीस दावा मिळकत खरेदी करण्याचा

कोणताही अग्रहक्क नव्हता व नाही. प्रतिवादी नं. १ चा मुलगा प्रशांत हा दावा मिळकतीची मेहनत, मशागत करीत आहे. त्यामुळे वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत करण्याचा कोणताही प्रश्न उदभवत नाही. दिवाणी मुकादमा नं.८६२/२००८ चा दावा फेटाळलेला आहे. वादीच्या नांवे केलेले कुलमुखत्यारपत्र प्रतिवादी नं. १ यांने रदद् केले आहे. शिवाय तशी नोटीस जाहीर नोटीसीने दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात प्रसिध्द केली. वादी, प्रतिवादी नं. १ आणि इतर बंधू यांनी यापूर्वीच वाटणी बाबतचा दावा क्र.१६९/१९९४ चा दाखल केला होता. तो दावा न्यायालयाने फेटाळला. त्याविरुध्द दिवाणी अपील ४६४/९९ दाखल केले होते. अपीलाच्या कामात तडजोड करुन वाद मिटवून घेतला व त्यानुसार दावा मिळकत प्रतिवादी नं. १च्या वाटणीस देण्यात आलेली होती. तेव्हापासून दावा मिळकतीची कब्जे वहिवाट प्रतिवादी नं.१ हा करीत आहे. अशाप्रकारे वाटणी झालेली असल्यामुळे वादीच्या मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. वादीने खोटा दावा दाखल केलेला आहे. तेव्हा वादीचा मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. वादी, प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

६. वादीच्या अर्जातील कथन व प्रतिवादींच्या म्हणण्यामधील कथन यावरुन प्रस्तुत अर्जाच्या निकालार्थ खालील मुददे काढण्यात आले आहेत व त्या मुददयांचा निष्कर्ष खालील कारणांवरुन मुदयांसमोरील निष्कर्षाप्रमाणे निर्णय देण्यात आला आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी दाव्यातील कथनाप्रमाणे आपला दावा आणलेला आहे काय? | नकारार्थी |
| २ | समतोल तत्व वादीच्या बाजूने आहे काय? | नकारार्थी |
| ३ | मनाई अर्ज मंजूर नाही केल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी |
| ४ | आदेश कोणते? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुददा क. १ ते ३ करिता

७. वादी मधुकर धोंडीराम पवार आणि प्रतिवादी शंकर धोंडीराम पवार हे नात्याने सख्खे भाउ आहेत. दावा मिळकत व इतर दोन शेतजमीनी जसे रिव्हीजनल सर्व्हे नंबर २४९, २३७, २७१ या तीन मिळकती इनाम जमीनी होत्या व आहेत. मुंबईचा रयत उपयोगी इनामे नष्ट करण्याचा कायदा अस्तित्वात आल्यानंतर दि.०१.०४.१९५४ पासून इनाम खालसा झाली होती. त्याकरिता इनामदार यांनी ३१.०३.१९५९ चे आत आकाराचे ६ पट कब्जा हक्काची किंमत भरली तर ती त्यांना रिग्रॅन्ड होण्यास पात्र आहे अशी कायदयात तरतूद केली होती. त्यानुसार फेरफार क.४५३७ दि.०७.०४.१९५६ रोजी मंजूर झाला. सातबारा उता-यावर दावा मिळकतीच्या बाबतीत सरकार आणि त्याच्या खाली कब्जेदार यांची नोंद मालक सदरी आहे. दावा मिळकत गटनंबर ३४१/४ क्षेत्र ०.६६ आर पोटखराब

०.०४ आर या मिळकतीस प्रतिवादी शंकर पवार यांची नोंद आहे. वादी मधुकर, प्रतिवादी शंकर आणि त्याचे इतर बंधू दिनकर आणि बाबुराव आणि इतर यांच्यामध्ये वाटणी झाल्याचा मुददा त्यांच्यामध्ये दिवाणी दावा क्र.१६९/९४ झाला होता. तो दावा वाटणीसाठी दाखल केला होता. तो दावा फेटाळण्यात आला. त्यानंतर त्या न्यायनिर्णयाविरुध्द दिवाणी अपील क्र.४६४/९९ दाखल केले होते. अपीलाच्या कामी वादी, प्रतिवादी शंकर आणि त्याचे इतर बंधू यांच्यामध्ये तडजोड झाली. ती तडजोड दि.२०.०२.२००३ रोजी झालेली आहे. त्यानुसार दावा मिळकत प्रतिवादी शंकर धोंडिराम पवार यांना मालकी हक्काने देण्यात आलेली आहे व तसा त्याचा कब्जा देखील देवून वादी मधुकर व त्यांचे इतर बंधू दिनकर व बाबुराव यांनी दावा मिळकतीवरील आपला हक्क सोडून दिला. यावरुन दावा मिळकत ही शंकर धोंडिराम पवार यांना वाटणीनुसार आलेली मिळकत आहे.

८. इनामदार खालसा कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्यातील तरतुदीनुसार जमीनीच्या आकाराचे ६ पट रक्कम नियमाप्रमाणे दि.३१.०३.१९५९ पूर्वी भरुन जमीन रिग्रॅन्ड करुन घेण्याची होती. याची पूर्तता वादी, प्रतिवादी शंकर आणि त्यांचे इतर बंधू यांनी केली नाही. असे जरी असले तरी शासनाने अदयाप इनामी जमीन काढून घेतलेली नाही. त्यामुळे असे गृहीत धरण्यात येते की, या मिळकतीची कब्जे वहिवाट वादी, प्रतिवादी व त्यांचे बंधू यांच्याकडेच इनामी जमीन जशीच्या तशी वहिवाटत आले आहेत व त्यांनी आपआपसात

तडजोड करुन वाटणी करुन घेतली. त्यामुळे त्या जमीनीवरील सरकारची मालकी याबाबतचे जे अस्तित्व आहे तो तसाच कायम राहण्याच्या अटीवर मिळकतीची वाटणी करुन घेतली आहे. सदयस्थितीत दावा मिळकत वाटणीनुसार प्रतिवादी शंकर यांना मिळालेला आहे. मिळकतीला सरकारची मालकी आहे तशी कायम राहून वाटणी करुन घेतली आहे. प्रतिवादी शंकर यास दावा मिळकतीची विक्री करता येत नाही अशी वादीची हरकत आहे. परंतु वादीचा दावा मिळकतीवरील आपला कोणताही हक्क राहिलेला नाही. कारण वादी आणि प्रतिवादी शंकर आणि त्यांचे इतर बंधू वाटणी करुन घेवून दावा मिळकतीवरील हक्क वादीने सोडून दिलेला आहे. असे असल्यामुळे वादीला दावा मिळकतीवर कोणताही हक्क राहिलेला नाही. मे. उच्च न्यायालयाने अशाप्रकारे वाटणी करुन घेतल्यानंतर प्रत्येकाला आपआपल्या हिश्श्याची मालकी हक्क वाटणीनुसार प्राप्त होतो असे न्यायनिर्णय केले आहेत. ते खालीलप्रमाणे.

The principle governing family arrangement is laid down in *Khumnilal v. Gobind Krishna Narain.* Their Lordships extracted with approval the following passage from the judgment in *Lalla Oudh Baharee Lal v. Ranee Mewa Koonwar,*

The true character of the transactions appear to us to have been a settlement between the several members of the family of their disputes, each one relinquishing all claim in respect of all property in

dispute other than that falling to his share, and recognizing the right of the others, as they had previously asserted it to the portion allotted to them respectively. It was in this light, rather than as conferring a new distinct title on each other, that the parties themselves seem to have regarded the arrangement and we think that it is the duty of the Courts to uphold and give full effect to such an arrangement".

९. दावा मिळकतीच्या बाबतीत अग्रहक्क वादी या एकटयाला नसून त्यांचे इतर बंधू दिनकर व बाबुराव यांना देखील अग्रहक्क आहे. परंतु अग्रहक्काच्या बाबतीत जो नियम लागू आहे त्यानुसार खरेदी करण्याची तयारी वादीने दाखविली तसे अग्रहक्काची मागणी वादीला मंजूर होवू शकते. परंतु त्याकरिता प्रतिवादीने करीत असलेल्या कोणत्याही व्यवहारास हरकत, अडथळा करण्याचा हक्क वादीला नाही. नियमाप्रमाणे दावा मिळकत प्रतिवादी शंकर याने वादी आणि त्यांचे इतर बंधू दिनकर आणि बाबुराव यांनी सदयस्थितीत असलेल्या बाजारभावाने खरेदी करावी असा आग्रह करण्याचा हक्क प्रतिवादी शंकर यास कायदयाने दिलेला आहे.

१०. प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा वादी आणि त्यांचे इतर बंधू दिनकर व बाबुराव यांनी त्यांचे हिस्से वादीकडून रक्कम रुपये ५०,०००/- घेवून हस्तांतर केले त्याप्रमाणे प्रतिवादी शंकर याने देखील तसे वादीला हस्तांतर करावे अशाप्रकारचे

कोणतेही बंधन वादीला प्रतिवादीवर घालता येत नाही. प्रतिवादी दावा मिळकतीच्या ठिकाणी रहात असून सांगली येथे रहात असेल, असे जरी असले तरी वाटणीनुसार मिळकत मिळालेली असल्यामुळे व त्यावरील वादीने आपला हक्क सोडून दिलेला असल्यामुळे वादीचा दावा मिळकतीवर कब्जा आहे असे कायदयाने गृहीत धरता येत नाही.

११. वरील विश्लेषण यावरुन मी या मतास आलो आहे की,वादीने मनाई अर्जातील कथनाप्रमाणे आपला दावा आणलेला नाही. तसेच समतोल तत्व वादीच्या बाजूने नाही. मनाई अर्ज मंजूर केल्यास वादीपेक्षा प्रतिवादी शंकर यांना जास्त नुकसान होवू शकते. यावरुन मुददा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी घेतले आहे आणि मुददा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

**१.** वादीचा निशाणी ५ चा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

sdxx

**(वि.र.दासरी)**

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव.**

कडेगांव.

ता.३०.०९.२०१५